ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधान:" इति कौटिल्य: अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १७ पुणें, बुधवार तारीख ११ एप्रिल, १९५१ अंक १५

॥ श्री ॥

## दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

— नवीन हंगामाची —

सत्तावीस लक्ष रुपयांची साखर तयार झाली

आणखी पंधरा लक्ष रुपयांची साखर तयार होत आहे.

साखर–विक्रीवर सरकारी नियंत्रण असल्यामुळें

३० जून १९५१ पर्यंत

★ एक वर्ष मुदतीच्या ठेवी कंपनी स्वीकारील ★

ऑर्डिनरी शेअरच्या भरलेल्या रकमेवर

★ गेलीं ९ वर्षें कंपनीनें १० टक्के नफा दिला आहे. ★

तेवीस लक्ष रुपयांचे शेअर मंजूर झाले आहेत.

★ शेअर–विक्री सुरू आहे ★

शेअर व ठेवीचे फॉर्म कंपनीच्या पुणें येथील मुख्य कचेरींत मिळतील.

★ ठेवींची मुदत १ वर्ष : व्याज ६ टक्के ★

दि. १ एप्रिल १९५१.
कॉमनवेल्थ बिल्डिंग, ९८०
सदाशिव पेठ, लक्ष्मीरोड, पुणें २.

चंद्रशेखर गोविंद आगाशे,
बी. ए., एल्एल्. बी.,
सी. जी. आगाशे ॲण्ड को.,
मॅनेजिंग एजंट्स.

**दळणाच्या चक्क्या–टूल ग्राइंडर्स**
**मशीन टूल्स**
कडवा कापण्याचीं यंत्रें—करवत मशीन्स.
या मालाबद्दल आमचेकडे चौकशी करण्यास विसरूं नका.
केळकर बंधु, लक्ष्मी रोड, पुणें शहर.

# विविध माहिती

**रशिआंतील किंमतींत आणखी घट**—सुमारें एक महिन्यापूर्वी रशिआंत ग्राहकांना लागणाऱ्या वस्तूंच्या किरकोळ विक्रीच्या किंमती उतरविण्यांत आल्या होत्या. आतां दूध आणि अंडीं ह्यांच्या किंमती आणखी उतरविण्यांत आल्या आहेत. किंमती उतरविलेल्या वस्तूंच्या यादींत पुढील पदार्थ आहेत:—सिगारेट्स्, तंबाखु, चहा, कॉफी, दूध, अंडीं, मासे व माशाचे पदार्थ, आरसे व दिवे. ह्या वस्तूंच्या किंमती आणखी १० टक्क्यांनीं कमी करण्यांत आल्या आहेत.

**कौटुंबिक अंदाजपत्रकांची चौकशी**—संयुक्त प्रांत सरकारनें मीरत, झांशी आणि अलाहाबाद जिल्ह्यांतील कामगार कुटुंबांच्या अंदाजपत्रकांची पहाणी सुरू केली आहे. ह्या कुटुंबांना हिंदींत हिशोब ठेवण्याविषयीं सांगण्यांत आलें असून हिशोब ठेवण्याच्या कामांत सरकारच्या मजूर खात्याचे अधिकारी त्यांना मदत करीत आहेत. रोजच्या खर्चाची नोंद कुटुंबें स्वतःच रोजच्या रोज करीत आहेत.

**फलज्योतिषाच्या अभ्यासाची संस्था**—फलज्योतिषाचा अभ्यास करण्यासाठीं कांहीं हौशी मंडळींनीं दिल्ली येथें एक संस्था नुकतीच स्थापन केली. ह्या प्रसंगीं भारतीय विधिमंडळाचे उपाध्यक्ष श्री. अनंतशयनम् अय्यंगार हजर होते. फलज्योतिष-विषयक ग्रंथांचा संग्रह करणें, ह्या विषयांतील तज्ज्ञांच्या परिषदा भरविणें, इत्यादि बाबींचा समावेश संस्थेच्या उद्दिष्टांत करण्यांत आला आहे.

**मध्यप्रदेशांतील मालगुजारी**—मध्यप्रदेश सरकारच्या मालगुजारी रद्द करण्याच्या कायद्यानुसार जबलपूर जिल्ह्यांतील २,६०० खेडेगांवें सरकारनें आपल्या व्यवस्थेखालीं घेतलीं. ह्या खेड्यांतून ३,००० मालगुजार होते. नागपूर हायकोर्टांत सुमारें ८०० मालगुजारांनीं हा कायदा घटनेच्या विरुद्ध आहे असा अर्ज केला आहे. ह्या प्रकरणाचा अजून निकाल लागलेला नाहीं.

**वृत्तपत्राच्या कागदावर कर**—स्वीडननें त्या देशाबाहेर निर्यात होणाऱ्या वृत्तपत्राच्या कागदावरील कर वाढविला आहे. हा कर दर टनामागें ३ पौंड, १० शिलिंग होता तो आतां दर टनामागें १४ पौंड करण्यांत आला आहे. निर्यात करांत झालेली ही वाढ पूर्वीच्या कराच्या चौपट आहे.

**रायचूरच्या खाणीचें उत्पादन**—हैदराबाद संस्थानमधील रायचूर जिल्ह्यांत सोन्याची खाण आहे. ह्या खाणींतून दरमहा सुमारें २,००० तोळे सोनें काढण्यांत येतें असें अधिकृत रीत्या जाहीर करण्यांत आलें आहे.

**भारताचा परदेशीय व्यापार**—१९५१ सालच्या जानेवारी महिन्यांत भारताच्या परदेशीय व्यापारांत १६१ लाख रुपयांची प्रतिकूल तफावत दिसून आली. हा आंकडा फक्त जमिनीवरून झालेल्या व्यापारासंबंधींचा आहे. ह्याच महिन्यांत इराण, अफगाणिस्तान व पाकिस्तान ह्यांच्याशीं झालेल्या व्यापारांत १२९ लाख रुपये किंमतीची निर्यात आणि २९० लाख रुपये किंमतीची आयात करण्यांत आली.

**पाकिस्तानच्या औद्योगिक योजना**—येत्या दोन वर्षांत औद्योगिक स्वरूपाच्या योजनांवर सुमारें ५० कोटी रुपये खर्च करण्याचें पाकिस्तान सरकारनें ठरविलें आहे असें समजतें. दक्षिण व आग्नेय अशिआ ह्यांच्यासाठीं जी कोलंबो योजना आंखण्यांत आली आहे तिचा एक भाग म्हणून पाकिस्ताननें सहा वर्षांचा एक कार्यक्रम आंखला आहे. ह्या कार्यक्रमांतील पहिलें पाऊल म्हणजेच वरील दोन वर्षांची योजना आहे.

**चांदी गाळण्याचा कारखाना**—अलीपूर येथील टांकसाळीला उपयोग व्हावा म्हणून चांदी गाळण्याचा एक कारखाना उभारण्यांत येत आहे. ह्या कारखान्यासाठीं ६०,००,००० रुपये खर्च येईल. त्यापैकीं १,००,००० रुपये आतांपर्यंत खर्चीं पडले आहेत. गेल्या महायुद्धांत काढण्यांत आलेल्या कांहीं चांदीच्या नाण्यांतील चांदी गाळण्यांत येणार आहे. चांदीच्या कारखान्याचें काम एका ब्रिटिश कंपनीकडे सोपविण्यांत आलें आहे.

**फुकटे रेल्वे प्रवासी**—बंगाल-नागपूर रेल्वेवर बिनतिकिटांनीं अगर गैरतिकिटांनीं प्रवास करणाऱ्या १,३१३ प्रवाशांवर १९५० च्या अखेरच्या तीन महिन्यांत रेल्वे ॲक्टप्रमाणें खटले करण्यांत आले. ह्या उतारूंकडून वसूल झालेल्या दंडाची रक्कम १२ लाख रुपये भरली.

**कलकत्त्यांतील फोनची व्यवस्था**—कलकत्ता शहरांतील टेलिफोन्स आपोआप मिळण्याची व्यवस्था करण्यासाठीं शहरांत एक्सचेंजचीं १२ नवीन केंद्रें उघडण्यांत येणार आहेत, असें भारताचे दळणवळण मंत्री श्री. रफी अहमद किडवाई ह्यांनीं पार्लमेंटमध्यें जाहीर केलें.

**आंब्याचें पीक कमी येणार**—चालू हंगामांत रत्नागिरी जिल्ह्यांतील हापूसच्या आंब्याचें पीक बेताचेंच येणार आहे, असें समजतें. हवेंतील उष्णता आणि ढगाळ हवा ह्यांच्यामुळें आंब्याचा पहिला मोहोर बराचसा गळून गेला असून दुसऱ्याचीहि फारशी आशा नाहीं. आंबे निर्यात करून भारताला डॉलर्स मिळवितां येतात.

**रशियाकडून गहूं मिळणार**—भारताकडून कच्चा ताग घेऊन त्याच्या बदला ५०,००० टन गहूं पुरविण्याचें रशिआनें कबूल केलें आहे. चीनकडूनहि ह्याच पद्धतीनें ५०,००० टन तांदूळ मिळणार आहे. त्यांपैकीं निम्मा तांदूळ आयात झालाहि आहे.

**पाकिस्तानला अमेरिकेचा कोळसा ?**—पाकिस्तानांतील रेल्वेजना वापरण्यासाठीं म्हणून अमेरिकेकडून १,००,००० टन कोळसा घेण्याच्या वाटाघाटी पाकिस्तान सरकार करीत आहे असें समजतें.

**पेणला सहकारी कारखाना**—तंबाकूवर बसविण्यांत आलेल्या कराची प्रतिक्रिया म्हणून पेण येथील विडीच्या छोट्या कारखानदारांनीं सहकारी तत्त्वावर एक विडीचा कारखाना काढण्याचें ठरविलें आहे, असें कळतें.

—सर्व प्रांतांतील—
सुती-गरम-रेशमी
—खादीचें माहेरघर—
**खादी मन्दिर**
२६१, बुधवार पेठ
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २.

# अर्थ

बुधवार, ता. ११ एप्रिल, १९५१





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## भारतामधील साबणाचा धंदा

साऊथ इंडिआ सोप मेकर्स असोसिएशन ह्या संस्थेची ४ थी वार्षिक परिषद् श्री. ए. के. मेनन ह्यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच भरली होती. आपल्या अध्यक्षीय भाषणांत श्री. मेनन म्हणाले कीं ह्या धंद्याच्या क्षेत्रांत शिरून सरकारनें खाजगी भांडवलाच्या धंद्याशीं स्पर्धा करूं नये. अशा उद्योगधंद्यांचा मार्ग सुकर करणें आणि त्यांना तांत्रिक स्वरूपाची मदत देणें हेंच खरें सरकारचें कार्य आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या काळांत साबणाच्या धंद्याला जोराची चालना मिळाली परंतु नंतर परिस्थिति बिघडत चालली आणि भारताची फाळणी झाल्यावर तर ती अधिकच खराब झाली. साबणाच्या निर्यातीला खंड पडला; आर्थिक मंदीमुळें देशांतील मागणीहि कमी झाली. माल खपेनासा झाल्यामुळें कारखान्यांजवळ तो शिल्लक पडूं लागला. साबण तयार करण्यास लागणाऱ्या कच्च्या मालाच्या किंमती वाढल्या; पण साबणाच्या किंमती मात्र जवळ जवळ पूर्वीच्याच राहिल्या. अशा परिस्थितींत सरकार कारखानदारांच्या मदतीला धांवलें नाहीं तर त्यांची धडगत नाहीं. कारखान्यापर्यंत कच्च्या मालाची वहातूक आणि कारखान्याच्या पक्क्या मालाची वहातूक, दोन्हींही द्रुतगतीनें करण्याचा प्रश्नही महत्त्वाचा आहे. रेल्वे स्टेशनवर बुकिंग करण्यास अजूनही फार काळ लागतो. युद्धापूर्वी साबणाच्या वहातुकीला जसे सवलतीचे दर होते तसे पुन्हा चालू करण्याची आवश्यकता आहे. साबणाच्या धंद्यांतील मजूरवर्ग मात्र इतर धंद्यांच्या मानानें कमी अस्वस्थ आहे. ह्या धंद्याची सध्याची परिस्थिति अशी आहे कीं, कामगारांना अधिक पगार देणें अगर इतर सवलती देणें अशक्य आहे. रहाणीच्या खर्चांत झालेली वाढ लक्षांत घेतां जास्त पगाराची मागणी अन्याय्य आहे असें म्हणतां येणार नाहीं. तथापि, सद्यःपरिस्थितींत कामगारांना सहानुभूति दाखविण्यापलीकडे कांहीं करतां येण्यासारखें नाहीं.

भारतांतून निर्यात होणाऱ्या साबणाला युद्धोत्तर काळीं पूर्वीइतकी मागणी राहिली नाहीं; कारण भारतीय साबणाच्या किंमती इतर देशांच्या साबणापेक्षां अधिक होत्या. कच्च्या मालाच्या किंमती भरमसाट वाढल्यामुळें भारतीय साबणाच्या किंमती वाढल्या; त्याला इलाजच नव्हता. कच्च्या मालाच्या परदेशाहून होणाऱ्या आयातीवरील कर रद्द करावा, निदान तो कमी करावा अशी मागणी देशी कारखानदारांनीं केली होती. परंतु सरकारनें तिकडे लक्ष दिलें नाहीं. विशेषतः तेलावरील जकात कारखानदारांना फार जाणवते. सरकारनें आपलें हें धोरण बदललें नाहीं तर ह्या धंद्याची परिस्थिति सुधारण्याची आशा फारच अल्प आहे. तेल आणि चरबी हे दोन पदार्थ साबणाच्या धंद्याचे मूलभूत स्वरूपाचे जिन्नस आहेत. सरकारनें जरा धिटाईचें धोरण स्वीकारून ह्या जिनसांच्या आयातीवरील कर रद्द करावा अशी विनंति श्री. मेनन ह्यांनी केली आहे. साऊथ इंडिआ सोप मेकर्स असोसिएशन संस्था आतां ऑल इंडिआ सोप अँड टॉयलेट मेकर्स असोसिएशन, कलकत्ता ह्या मोठ्या संस्थेंत विलीन करण्यांत आली आहे.

---

## बचतयोजनांची प्रगति

### दशवार्षिक ट्रेझरी सेव्हिंग्ज डिपॉझिटस

भारत सरकारनें कांहीं दिवसांपूर्वी सुरू केलेल्या दशवार्षिक ट्रेझरी सेव्हिंग्ज डिपॉझिट सर्टीफिकिटांच्या योजनेची चांगली प्रगति होत आहे. प्रस्तुत योजनेस फेब्रुवारी, १९५१ पासून सुरवात झाली असून निरनिराळ्या राज्यांकडून आलेल्या आंकड्यांवरून २७ मार्च १९५१ पर्यंत या योजनेनुसार लोकांनीं ४.८५ कोटी रुपये किंमतीचीं सर्टीफिकिटें विकत घेतलीं आहेत.

### राष्ट्रीय बचत रोखे.

१९४३ मध्यें राष्ट्रीय बचत रोख्यांची योजना प्रथम सुरू झाल्यापासून डिसेंबर १९५० पर्यंत सुमारें १२८ कोटी रुपयांचे रोखे विकण्यांत आले. १९४८–४९ पासूनच्या पुढील तीन वर्षांच्या कामाच्या तपशीलवार आंकडेवारीवरून या काळांत ६०.५९ रुपये किंमतीच्या रोख्यांची विक्री होऊन २०.५० रुपयांची फेड झाली असल्याचें दिसून येतें. विक्रीचे बाबतींत २२.२४ कोटी रुपये किंमतींच्या रोख्यांच्या विक्रीनें मुंबई आघाडीवर असून त्यानंतर पश्चिम बंगाल ( १०.५१ कोटी रुपये ), मद्रास ( ७.८६ कोटी रुपये ), उत्तर प्रदेश ( ६ कोटी रुपये ), पंजाब ( ४.७८ कोटी रुपये ), दिल्ली ( ३.०१ कोटी रुपये ), मध्यप्रदेश ( २.८३ कोटी रुपये ), बिहार व ओरिसा ( २.०१ कोटी रुपये ) व आसाम ( १.०४ कोटी रुपये ) यांचा क्रमांक लागतो.

१९४३ मध्यें सुरू करण्यांत आलेली राष्ट्रीय बचतरोख्यांची योजनाहि ट्रेझरी सेव्हिंग्ज डिपॉझिट सर्टीफिकिटांच्या योजनेबरोबर चालू आहे. प्रस्तुत योजनेच्या सुरुवातीला बचतरोख्यांच्या विक्रीस चालना मिळावी म्हणून २॥ टक्के कमिशनवर अधिकृत एजंट नेमण्यांत आले होते. परंतु कांहीं काळानें या पद्धतींत दोष निर्माण झाल्यानें ती १९४८ पासून रद्द करण्यांत आली. तथापि ही पद्धत पुन्हा मुंबई, पश्चिम बंगाल व मद्रास या राज्यांत प्रायोगिक उपाय व नीट खबरदारी घेऊन परत चालू करण्यांत आली आहे. तथापि ५ रुपयांचे रोख्यांखेरीज कमिशनचें प्रमाण १। टक्क्यांपर्यंत आणण्यांत आलें असून तें १२ वर्षें मुदतीच्या रोख्यांवरच दिलें जाईल.

५ व ७ वर्षें मुदतीचे रोखे केव्हांही परत करून त्यांत गुंतविलेले पैसे परत घेतां येतात, परंतु १२ वर्षें मुदतीच्या रोख्यांच्या बाबतींत ते घेतल्यापासून १॥ वर्षानंतरच असें करतां येईल. मूळ रकमेबरोबरच व्याज देण्यांत येतें. व्याजाचा दर पहिल्या कांहीं वर्षांत कमी असतो, यामुळें रोखे विकण्यावर एक प्रकारचा आळा बसतो. हे रोखे १२, ७ व ५ वर्षें या ठरलेल्या मुदतीपर्यंत ठेवल्यास त्यांवर अनुक्रमें ४½, ३¾ व २ टक्के सव्वा व्याज मिळतें. या रोख्यांत एका व्यक्तीस जास्तींत जास्त २५ हजार रुपयांपर्यंत रक्कम गुंतवितां येईल व त्यावर प्राप्तिकर आकारला जाणार नाहीं.

---

## लोहाराच्या धंद्यांत ब्रिटनमध्यें झालेली क्रांति

( भा. म. कळे )

हल्लींच्या यंत्रयुगामध्यें लहान गांवांतील धंद्यामध्येंहि यंत्रयुगाला पोषक अशी क्रांति होत आहे. शास्त्रीय ज्ञानाच्या जोरावर खेडेगांवांतील लोहाराच्या धंद्यांत ब्रिटनमध्यें दिसून आलेली क्रांति विशेष नमुनेदार आहे. १९२१ सालीं ' रूरल इंडस्ट्रीज बरो ' ही संस्था स्थापन करण्यांत आली. या संस्थेचा उद्देश रूरल कम्युनिटी कौन्सिलशीं सहकार्य करून ग्रामीण विभागांतील जीवन सुधारणें हा आहे. इंग्लंड व वेल्स या विभागांत अशा प्रकारचीं २९ कौन्सिलें रूरल इंडस्ट्रीज बरोशीं सहकार्य करीत आहेत. या बरोचा उद्देश खेडेगांवांतील कामगारांमध्यें उच्च दर्जाची कार्यक्षमता अभिनव मार्ग व यंत्रें यांच्या सहाय्यानें निर्माण करणें हा आहे. या कामासाठीं शेती खात्यातर्फे या बरोला मदत मिळत असते. गिऱ्हाईक व माल बनविणारा या दोघानांहि परवडेल अशी किंमत ठेवणें हा या बरोचा उद्देश असतो. हा उद्देश साध्य करणें फार कठीण असतें. यासाठी यंत्रज्ञ नेमून त्यांच्याकडून संशोधनपूर्वक नवीन पद्धती शोधून काढून त्यांचा मालाच्या निर्मितीमध्यें उपयोग करण्यावर भर दिला जातो. अशा प्रकारें मिळणाऱ्या माहितीचा आपल्या कलेचें किंवा धंद्याचें उत्पादन वाढविण्यासाठी कामगार लोक उत्सुकतेनें उपयोग करून घेतात.

याचा परिणाम असा झाला आहे कीं लाकूडकाम करणारे, लोहार, शेतीसाठीं माल बनविणारे, भांडीं करणारे, विटा बनविणारे इ. ग्रामीण विभागांतील सर्व लोक राष्ट्राच्या जीवनांत मोठी उपयुक्त कामगिरी बजावीत आहेत. रूरल इंडस्ट्रीज बरोच्या सहाय्यानें या व्यवसायांतील लोकांनीं आपल्या उत्पादनांत बदलणाऱ्या युगांतील कालप्रवाहानुरूप क्रांति केली आहे, व त्यामुळें त्यांनीं आपल्या व्यवसायाचा दर्जाहि वाढविला आहे. लोहार लोक आतां विशेषतः वेल्डिंग व इंजीनियरिंगचीं कामें करूं लागले आहेत. घोड्याला नाल मारण्याचें काम आतां जवळजवळ बंद पडलें आहे, परंतु यांत्रिक नांगर व इतर यंत्रें यांची दुरुस्ती लोहार लोक करूं शकतात. रूरल इंडस्ट्रीज बोर्डाकडून अशा तऱ्हेचीं कामें करण्यासाठीं आवश्यक अशी तांत्रिक माहिती पुरविली जाते व विजेचाहि मधून मधून जरुरीप्रमाणें पुरवठा केला जातो. फिरत्या गाड्यांमधून नवीन नवीन यांत्रिक ज्ञानाची माहिती खेडेगांवांतील लोहारांना करून दिली जाते. लोहारांप्रमाणेंच इतर धंद्यांतील लोकांनाहि उपयुक्त यांत्रिक माहिती पुरविली जाऊन आजच्या जीवनाच्या दृष्टीनें त्यांच्या धंद्यांत सुधारणा केली जाते. सध्यां लाकूड काम करणारे लोक अशा प्रकारें यांत्रिक माहिती मिळण्याबद्दल उत्सुक आहेत. विटा करण्याच्या धंद्यामध्येंहि यंत्रांचा उपयोग करून कामगारांच्या प्राप्तींत आठवड्याला दोन पौंडांची भर पडली आहे. ब्रिटनमधील रूरल इंडस्ट्रीज बरोचें हें उपयुक्त कार्य हिंदी ग्रामीण जीवनाच्या दृष्टीनें मार्गदर्शक आहे. •

---

निकेलच्या वापरावर नियंत्रण—तापविण्याचीं भांडीं, जेवण तयार करण्याचीं भांडीं, शीतपेटिका, इत्यादि ७० प्रकारच्या वस्तूंत निकेल ही धातू वापरण्यास बंदी करण्याचा हुकूम अमेरिकेच्या उत्पादन खात्याच्या अधिकाऱ्यांनीं काढला आहे. जेट विमानांच्या निर्मितींत निकेलचा उपयोग करण्यांत येत असल्यामुळें हा हुकूम काढण्यांत आला आहे.

## बँकेचे अध्यक्ष काय म्हणतात ?

### धंदेवाल्यांनो, नाउमेद होऊं नका!

" सरकार काय करतें किंवा करीत नाहीं, ह्याची चर्चा न करतां शक्य त्या मार्गानें उत्पादन वाढविणें, त्यायोगें किंमतींत उतार घडवून आणणें, संपत्तींत भर टाकून सामान्य माणसाच्या रहाणीचें मान वाढविणें आणि अशा रीतीनें आपली उपयुक्तता सिद्ध करणें, हें आपलें कर्तव्य आहे. सरकारच्या कांहीं चुका होतील त्या त्याच्या अननुभवामुळेंच होय, हें आपण विसरतां कामा नये; आपल्या देशासाठीं आपलें कर्तव्य बजावण्यास आपण विसरून चालणार नाहीं. पूर्वीच्या काळीं, परकीय सत्तेच्या अंमलाखालील प्रचंड अडचणींना आपण तोंड दिलें; आतां, आपल्याच सरकारच्या कारभाराखालीं आपण अधिक नेटानें कार्य केलें पाहिजे. तरच व्यापारी व कारखानदार ह्यांची धडगत आहे. तेव्हां, त्यांनीं नाउमेद न होतां भवितव्यावर विश्वास ठेवून पूर्वीप्रमाणेंच निष्ठेनें कार्यप्रवण झालें पाहिजे. "

युनायटेड कमर्शिअल बँक जी. डी. बिर्ला

---

### भारत बँक आणि पंजाब नॅशनल बँक

११ मार्च, १९५१ रोजीं, म्हणजे बरोबर एक महिन्यापूर्वी, पंजाब नॅशनल बँकेनें भारत बँकेच्या ठेवीदारांचें देणें देण्याचें पत्करल्याचा करार करण्यांत आला. ह्या कराराप्रमाणें, भारत बँकेच्या ५९ शाखा पंजाब नॅशनल बँकेच्या शाखा म्हणून काम करूं लागल्या आहेत. बाकीच्या शाखा पंजाब नॅशनल बँकेच्या शाखांत विलीन झाल्या आहेत.

भारत बँक १९४२ सालीं स्थापन झाली. १९४३-४४ मध्यें तिच्या १८७ शाखा होत्या, त्या १९४६-४७ मध्यें २९२ झाल्या आणि तिचेकडील ठेवी १४ कोटी रुपयांवरून १९४५-४६ मध्यें ३० कोटी रुपयांवर गेल्या. पण १९४६-४७ मध्यें त्या २२ कोटी रुपयांवर उतरल्या. पुढें मात्र ठेवींत फार मोठी घट होऊन त्यांची रक्कम १९५० अखेर १० कोटी रुपयांचेहि खालीं गेली. १९४६-४७ मधील २६ लाखांच्या नफ्याचे जागीं १९५० मध्यें ५½ लक्ष रु. तोटा दिसून आला. दोन-तीन वेळां ठेवीदारांनीं पैसे मागण्याची निकड चालविली, त्यांतून बँक यशस्वी रीतीनें बाहेर पडली. बँकेच्या डायरेक्टर बोर्डानें खर्च कमी करून तोट्यांत चालणाऱ्या शाखा बंद केल्या, पण बँकिंग ट्रायब्यूनलच्या निवाड्यामुळें वाढलेल्या खर्चाची तोट्यांत भर पडली. सरकारी रोख्यांच्या किंमती उतरल्या. १५५ शाखा चालवून १० कोटी रु. खेळतें भांडवल बँकेच्या भागीदारांना ३·१ कोटी रु. शेअर भांडवलावर डिव्हिडंड देण्यास असमर्थ असल्याचें बोर्डास दिसून आलें. दुसऱ्या बँकेंत विलीन होणें, लिक्विडेशनमध्यें जाणें किंवा दुसऱ्या बँकेकडे येणें-देणें वर्ग करणें ह्या तीन उपलब्ध मार्गांपैकीं तिसरा मार्ग बोर्डानें पत्करला आणि पंजाब नॅशनल बँकेच्या सहकार्यामुळें योग्य तो करार होऊं शकला.

---

### दि कल्याण पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, कल्याण

बँकेच्या शाहापूर शाखेचा उद्घाटनसमारंभ ता. ७ एप्रिल, १९५१ शनिवार रोजीं सकाळीं ८-३० वाजतां शाहापूर येथें श्याम टॉकीजमध्यें श्री. वामन पुंडलिक वर्दे बी. कॉम., यांचे अध्यक्षतेखालीं झाला.

---

## दि सांगली बँक लि., सांगली

वरील शेड्यूल्ड बँकेस १९५० मध्यें ७९,४७६ रु. नफा झाला. १० हजार रु. नोकर वर्गास बोनस, ५ हजार रु. जनरल रिझर्व्ह, २५ हजार रु. टॅक्सेशन रिझर्व्ह, १ हजार रु. धर्मादाय फंड, ३४,७४८ रु. डिव्हिडंड ( ११% करमाफ ) अशी नफा-वाटणी होणार आहे. बँकेस संस्थान असतांना ज्या सवलती होत्या त्या मुंबई सरकारनें मार्च, १९५२ पर्यंत चालू ठेवण्याचें मान्य केलें आहे. बँकेचे माजी चेअरमन श्री. ह. व. कुलकर्णी, बी. ए., हे अहवालाचे वर्षी १३ वर्षांनीं सेवानिवृत्त झाले. त्यांनीं बँकेच्या केलेल्या बहुमोल सेवेचा उल्लेख डायरेक्टरांच्या रिपोर्टांत करण्यांत आला आहे. बँकेचा जनरल रिझर्व्ह वसूल भांडवला-पेक्षाहि ज्यास्त असल्यानें, रिझर्व्ह फंडांत रकम टाकण्यासंबंधींचें कायद्याचें कलम ह्या बँकेस लागूं नाहीं, हें बँकेच्या मजबुतीचें एक चिन्ह आहे. ( चेअरमन : एस्. ई. सुखथनकर, आय. ए. एस., कलेक्टर, द. सातारा जिल्हा. मॅनेजर: एम्. के. गुत्ते, एम्. ए. )

### संक्षिप्त ताळेबंद

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | ३,००,००० | रोख व इतर शिल्लक | १८,४९,११२ |
| जनरल व इतर रिझर्व्ह | ४,०८,२२८ | इनव्हेस्टमेंट | २८,८१,७७६ |
| ठेवी | ७६,५९,६०८ | कर्जें | ४२,८४,५६८ |
| नफा | ७९,४७६ | इमारत इ. | ३०८,२३२ |

## पाकिस्तानचा कागदाचा नवा कारखाना

पूर्व–पाकिस्तानांत चितगांवापासून १५ मैलांवर चंद्रगांव येथें कागदाचा एक कारखाना काढण्याचें पाकिस्तान सरकारनें ठरविलें होतें. चंद्रगांवांत आतां ह्या कारखान्याची धामधूम सुरू झाली आहे. कारखान्याची यंत्रसामुग्री नुकतीच येऊन पोंचली आहे. कारखान्यासाठी एकूण खर्च सुमारें ४,५०,००,००० रुपये येणार आहे. यंत्रसामुग्री घेऊन येण्यास दोन बोटी लागल्या. कांहीं यंत्रसाहित्य युरोपांतून आणि कांहीं अमेरिकेंतून आणण्यांत आलें आहे. तिसऱ्या एका बोटीनें कारखान्यासाठी लागणारा कच्चा मालहि आणला आहे. उत्पादनांत प्रत्यक्ष गुंतणाऱ्या यंत्रसाहित्याची किंमत सुमारें २,३०,३६,५२६ रुपये आहे आणि कारखान्याच्या उभारणीला लागणाऱ्या सामुग्रीची किंमत २६,३७,१५२ रुपये आहे. कारखान्याच्या जागेची पहाणी आणि साफसफाई पूर्ण झाली आहे. अधिकारी वर्ग आणि इतर नौकर ह्यांना रहाण्यासाठी ५०० घरें बांधून तयार झालीं आहेत. आणखीहि इमारती बांधण्याचें काम चालू आहे. कारखान्याला लागणारी वीज आणि वाफ पुरविण्यासाठी १३,५०० किलोवॅट वीज उत्पन्न करण्याचें एक केंद्र उभारण्यांत आलें आहे. पाण्याच्या पुरवठ्याची व्यवस्थाहि पूर्ण झाली आहे. कारखान्याच्या मुख्य इमारतींच्या बांधकामाला लवकरच प्रारंभ होणार आहे. कागद तयार करणाऱ्या यंत्रांचा एक संच १९५१ अखेर काम करूं लागेल. १९५३ च्या प्रारंभीं सर्व कारखाना कागद उत्पन्न करूं लागेल. पूर्ण उत्पादन होऊं लागलें म्हणजे दरवर्षी सुमारें ३०,००० टन कागद तयार होईल, आणि पाकिस्तानला लागणाऱ्या लिहावयाच्या आणि छापावयाच्या कागदाची गरज पूर्णपणें भागेल असा अंदाज करण्यांत आला आहे. पू. पाकिस्तानची आर्थिक भरभराट तर ह्या कारखान्यामुळें होईलच, पण शिवाय ३,५०० कामगारांना रोजगारहि मिळेल.


सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लि.



( स्थापना १९१८ )

बचतीच्या विविध योजना

हेड ऑफिस– गिरगांव, मुंबई.

शाखा : दादर, माहीम, बेळगांव


## दि सुप्रीम बँक ऑफ इंडिया लि., बेळगांव

वरील बँकेस १९५० ह्या वर्षी २४,१५१ रु. नफा झाला. रिझर्व्ह फंड ५ हजार रु., कराची तरतूद ५,५०० रु., बॅड डेट रिझर्व्ह फंड १,७५० रु., अशी वाटणी करून उरलेल्या रकमेंतून ऑर्डिनरी भागांस ४½% करमाफ डिव्हिडंड व क्यु. प्रे. भागांस ६¼% करमाफ डिव्हिडंड देण्यांत यावयाचें आहे. बँकांस सर्व-साधारणपणें येणाऱ्या अडचणी लक्षांत घेतां, सुप्रीम बँकेनें २१ लक्ष रु. खेळत्या भांडवलावर, बँकांकडून कर्जाऊ रकमा ताळेबंदांत न दाखवितां, चांगला नफा मिळविला आहे. बँकेच्या कोल्हापूर आणि अरोंदे ( रत्नागिरी ) येथें शाखा आहेत.

( चेअरमन : एस. जी. पंत बाळेकुंद्री, बी. ए., एलएल. बी. मॅ. डायरेक्टर: एस. के. सामंत )

### संक्षिप्त ताळेबंद

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | २,५०,०७० | रोख व इतर बँकांत | ८,१९,४३७ |
| रि. व इतर फंड | ५६,८४१ | इनव्हेस्टमेंट | ३,४२,८३२ |
| ठेवी | १७,०५,९३९ | कर्जें | ७,०५,००३ |
| नफा | २४,१५१ | | |

## मुरादाबाद येथील पितळयाच्या मालाचा कारखाना

संयुक्त–प्रांत सरकारच्या अर्थशास्त्र आणि आंकडेशास्त्र खात्या-तर्फे मुरादाबाद येथील पितळेच्या वस्तूंच्या धंद्यासंबंधीं एक तपशीलवार अहवाल प्रसिद्ध करण्यांत आला आहे. ह्या धंद्यासंबंधीं इतकी साधार माहिती प्रसिद्ध होण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे. श्री. विश्वनाथ प्रसाद चतुर्वेदी ह्यांनीं माहिती जमविण्याचें काम केलें. त्यासाठीं त्यांना तीन वर्षें लागलीं.

प्रस्तुतच्या धंद्यासंबंधींची आर्थिक आणि व्यापारविषयक चर्चा अहवालांत बरीच विस्तारानें करण्यांत आली आहे. धंदा आधुनिक पद्धतींवर संघटित करण्यासाठीं काय करावें ह्या संबंधीं सूचनाहि करण्यांत आलेल्या आहेत. आतांपर्यंत हा धंदा घरगुती स्वरूपाचा होता. एखादा–दुसरा कसबी कामगार आणि त्याचें कुटुंब स्वतः खपून उत्पादन करीत असे. अलीकडे मात्र कांहीं ठिकाणीं यंत्रें वापरण्यांत येऊं लागलीं होतीं, व आहेत. धंद्याला असलेल्या आंतरराष्ट्रीय महत्त्वाचा विचारहि अहवालांत करण्यांत आलेला आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेंत मुरादाबादच्या पितळेच्या मालाला जें कांहीं थोडेंबहुत महत्त्व प्राप्त झालेलें आहे, त्याचें श्रेय खाजगी रीतीनें माल निर्यात करणाऱ्यांनाच आहे. ह्या बाबतींत सरकारची मदत जवळजवळ नाहींच असें म्हटलें तरी चालेल. ह्या उद्योग-धंद्यांत सुमारें २५,००० कामगार गुंतलेले आहेत. परंतु त्यांची सध्याची अवस्था शोचनीय आहे. शहराच्या निरनिराळ्या भागांत वस्ती करून हे कामगार राहिलेले आहेत. त्यांचीं घरें हीं घरें ह्या नांवाला मुळींच योग्य नाहींत. आरोग्याच्या दृष्टीनें योग्य अशीं घरें त्यांना मिळवून देण्याची फार जरूर आहे. मेल्या ऑगस्ट-मध्यें संयुक्त–प्रांत सरकारचे गव्हर्नर श्री. मोदी ह्यांना मुरादाबाद नगरपालिकेनें मानपत्र दिलें होतें. त्यावेळीं नगरपालिकेनें काम-गारांच्या घरांबाबत कांहींतरी करावें अशी सूचनाहि त्यांनीं केली होती.

## लोहाराच्या धंद्यांत ब्रिटनमध्यें झालेली क्रांति

**( मा. म. कळे )**

हल्लींच्या यंत्रयुगामध्यें लहान गांवांतील धंद्यामध्येंहि यंत्रयुगाला पोषक अशी क्रांति होत आहे. शास्त्रीय ज्ञानाच्या जोरावर खेडेगांवांतील लोहाराच्या धंद्यांत ब्रिटनमध्यें दिसून आलेली क्रांति विशेष नमुनेदार आहे. १९२१ सालीं 'रूरल इंडस्ट्रीज बरो' ही संस्था स्थापन करण्यांत आली. या संस्थेचा उद्देश रूरल कम्युनिटी कौन्सिलशीं सहकार्य करून ग्रामीण विभागांतील जीवन सुधारणें हा आहे. इंग्लंड व वेल्स या विभागांत अशा प्रकारचीं ३९ कौन्सिलें रूरल इंडस्ट्रीज बरोशीं सहकार्य करीत आहेत. या बरोचा उद्देश खेडेगांवांतील कामगारांमध्यें उच्च दर्जाची कार्यक्षमता अभिनव मार्ग व यंत्रें यांच्या सहाय्यानें निर्माण करणें हा आहे. या कामासाठीं शेती खात्यातर्फे या बरोला मदत मिळत असते. गिऱ्हाईक व माल बनविणारा या दोघानांहि परवडेल अशी किंमत ठेवणें हा या बरोचा उद्देश असतो. हा उद्देश साध्य करणें फार कठीण असतें. यासाठी यंत्रज्ञ नेमून त्यांच्याकडून संशोधनपूर्वक नवीन पद्धती शोधून काढून त्यांचा मालाच्या निर्मितीमध्यें उपयोग करण्यावर भर दिला जातो. अशा प्रकारें मिळणाऱ्या माहितीचा आपल्या कलेचें किंवा धंद्याचें उत्पादन वाढविण्यासाठीं कामगार लोक उत्सुकतेनें उपयोग करून घेतात.

याचा परिणाम असा झाला आहे कीं लाकूडकाम करणारे, लोहार, शेतीसाठीं माल बनविणारे, भांडीं करणारे, विटा बनविणारे इ. ग्रामीण विभागांतील सर्व लोक राष्ट्राच्या जीवनांत मोठी उपयुक्त कामगिरी बजावीत आहेत. रूरल इंडस्ट्रीज बरोच्या सहाय्यानें या व्यवसायांतील लोकांनीं आपल्या उत्पादनांत बदलणाऱ्या युगांतील कालप्रवाहानुरूप क्रांति केली आहे, व त्यामुळें त्यांनीं आपल्या व्यवसायाचा दर्जाहि वाढविला आहे. लोहार लोक आतां विशेषतः वेल्डिंग व इंजीनियरिंगचीं कामें करूं लागले आहेत. घोड्याला नाल मारण्याचें काम आतां जवळजवळ बंद पडलें आहे, परंतु यांत्रिक नांगर व इतर यंत्रें यांची दुरुस्ती लोहार लोक करूं शकतात. रूरल इंडस्ट्रीज बोर्डाकडून अशा तऱ्हेचीं कामें करण्यासाठीं आवश्यक अशी तांत्रिक माहिती पुरविली जाते व विजेचाहि मधून मधून जरुरीप्रमाणें पुरवठा केला जातो. फिरत्या गाड्यांमधून नवीन नवीन यांत्रिक ज्ञानाची माहिती खेडेगांवांतील लोहारांना करून दिली जाते. लोहारांप्रमाणेंच इतर धंद्यांतील लोकांनाहि उपयुक्त यांत्रिक माहिती पुरविली जाऊन आजच्या जीवनाच्या दृष्टीनें त्यांच्या धंद्यांत सुधारणा केली जाते. सध्यां लाकूड काम करणारे लोक अशा प्रकारें यांत्रिक माहिती मिळण्याबद्दल उत्सुक आहेत. विटा करण्याच्या धंद्यामध्येंहि यंत्रांचा उपयोग करून कामगारांच्या प्राप्तींत आठवड्याला दोन पौंडांची भर पडली आहे. ब्रिटनमधील रूरल इंडस्ट्रीज बरोचें हें उपयुक्त कार्य हिंदी ग्रामीण जीवनाच्या दृष्टीनें मार्गदर्शक आहे. •

---

निकेलच्या वापरावर नियंत्रण—तापविण्याचीं भांडीं, जेवण तयार करण्याचीं भांडीं, शीतपेटिका, इत्यादि ७० प्रकारच्या वस्तूंत निकेल ही धातू वापरण्यास बंदी करण्याचा हुकूम अमेरिकेच्या उत्पादन खात्याच्या अधिकाऱ्यांनीं काढला आहे. जेट विमानांच्या निर्मितींत निकेलचा उपयोग करण्यांत येत असल्यामुळें हा हुकूम काढण्यांत आला आहे.

## बँकेचे अध्यक्ष काय म्हणतात ?

**धंदेवाल्यांनो, नाउमेद होऊं नका!**

"सरकार काय करतें किंवा करीत नाहीं, ह्याची चर्चा न करतां शक्य त्या मार्गानें उत्पादन वाढविणें, त्यायोगें किंमतींत उतार घडवून आणणें, संपत्तींत भर टाकून सामान्य माणसाच्या राहाणीचें मान वाढविणें आणि अशा रीतीनें आपली उपयुक्तता सिद्ध करणें, हें आपलें कर्तव्य आहे. सरकारच्या कांहीं चुका होतील त्या त्याच्या अननुभवामुळेंच होय, हें आपण विसरतां कामा नये; आपल्या देशासाठीं आपलें कर्तव्य बजावण्यास आपण विसरून चालणार नाहीं. पूर्वीच्या काळीं, परकीय सत्तेच्या अंमलाखालील प्रचंड अडचणींना आपण तोंड दिलें; आतां, आपल्याच सरकारच्या कारभाराखालीं आपण अधिक नेटानें कार्य केलें पाहिजे. तरच व्यापारी व कारखानदार ह्यांची धडगत आहे. तेव्हां, त्यांनीं नाउमेद न होतां भवितव्यावर विश्वास ठेवून पूर्वीप्रमाणेंच निष्ठेनें कार्यप्रवण झालें पाहिजे."

युनायटेड कमर्शिअल बँक  जी. डी. बिर्ला

---

### भारत बँक आणि पंजाब नॅशनल बँक

११ मार्च, १९५१ रोजीं, म्हणजे बरोबर एक महिन्यापूर्वी, पंजाब नॅशनल बँकेनें भारत बँकेच्या ठेवीदारांचें देणें देण्याचें पत्करल्याचा करार करण्यांत आला. ह्या कराराप्रमाणें, भारत बँकेच्या ५९ शाखा पंजाब नॅशनल बँकेच्या शाखा म्हणून काम करूं लागल्या आहेत. बाकीच्या शाखा पंजाब नॅशनल बँकेच्या शाखांत विलीन झाल्या आहेत.

भारत बँक १९४२ सालीं स्थापन झाली. १९४३-४४ मध्यें तिच्या १८७ शाखा होत्या, त्या १९४६-४७ मध्यें २९२ झाल्या आणि तिचेकडील ठेवी १४ कोटी रुपयांवरून १९४५-४६ मध्यें ३० कोटी रुपयांवर गेल्या. पण १९४६-४७ मध्यें त्या २२ कोटी रुपयांवर उतरल्या. पुढें मात्र ठेवींत फार मोठी घट होऊन त्यांची रक्कम १९५० अखेर १० कोटी रुपयांचेहि खाली गेली. १९४६-४७ मधील २६ लाखांच्या नफ्याचे जागीं १९५० मध्यें ५½ लक्ष रु. तोटा दिसून आला. दोन-तीन वेळां ठेवीदारांनीं पैसे मागण्याची निकड चालविली, त्यांतून बँक यशस्वी रीतीनें बाहेर पडली. बँकेच्या डायरेक्टर बोर्डानें खर्च कमी करून तोट्यांत चालणाऱ्या शाखा बंद केल्या, पण बँकिंग ट्रायब्युनलच्या निवाड्यामुळें वाढलेल्या खर्चाची तोट्यांत भर पडली. सरकारी रोख्यांच्या किंमती उतरल्या. १५५ शाखा चालवून १० कोटी रु. खेळतें भांडवल बँकेच्या भागीदारांना ३·१ कोटी रु. शेअर भांडवलावर डिव्हिडंड देण्यास असमर्थ असल्याचें बोर्डास दिसून आलें. दुसऱ्या बँकेंत विलीन होणें, लिक्विडेशनमध्यें जाणें किंवा दुसऱ्या बँकेकडे येणें-देणें वर्ग करणें ह्या तीन उपलब्ध मार्गांपैकीं तिसरा मार्ग बोर्डानें पत्करला आणि पंजाब नॅशनल बँकेच्या सहकार्यामुळें योग्य तो करार होऊं शकला.

---

**दि कल्याण पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, कल्याण**

बँकेच्या शाहापूर शाखेचा उद्घाटनसमारंभ ता. ७ एप्रिल, १९५१ शनिवार रोजीं सकाळीं ८-३० वाजतां शाहापूर येथें श्याम टॉकीजमध्यें श्री. वामन पुंडलिक वर्दे बी. कॉम., यांचे अध्यक्षतेखालीं झाला.

## दि सांगली बँक लि., सांगली

वरील शेडयूल्ड बँकेस १९५० मध्यें ७९,४७६ रु. नफा झाला. १० हजार रु. नोकर वर्गास बोनस, ५ हजार रु. जनरल रिझर्व्ह, २५ हजार रु. टॅक्सेशन रिझर्व्ह, १ हजार रु. धर्मादाय फंड, ३४,७४८ रु. डिव्हिडंड ( ११% करमाफ ) अशी नफा-वाटणी होणार आहे. बँकेस संस्थान असतांना ज्या सवलती होत्या त्या मुंबई सरकारनें मार्च, १९५२ पर्यंत चालू ठेवण्याचें मान्य केलें आहे. बँकेचे माजी चेअरमन श्री. ह. व. कुलकर्णी, बी. ए., हे अहवालाचे वर्षी १३ वर्षांनीं सेवानिवृत्त झाले. त्यांनीं बँकेच्या केलेल्या बहुमोल सेवेचा उल्लेख डायरेक्टरांच्या रिपोर्टांत करण्यांत आला आहे. बँकेचा जनरल रिझर्व्ह वसूल भांडवला-पेक्षाहि ज्यास्त असल्यानें, रिझर्व्ह फंडांत रकम टाकण्यासंबंधींचें कायद्याचें कलम ह्या बँकेस लागूं नाहीं, हें बँकेच्या मजबुतीचें एक चिन्ह आहे. ( चेअरमन: एस्. ई. सुखथनकर, आय. ए. एस., कलेक्टर, द. सातारा जिल्हा. मॅनेजर: एम्. के. गुत्ते, एम्. ए. )

### संक्षिप्त ताळेबंद

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | ३,००,००० | रोख व इतर | |
| जनरल व इतर | | शिल्लक | १८,४९,११२ |
| रिझर्व्ह | ४,०८,२२८ | इनव्हेस्टमेंट | २८,८१,७७६ |
| ठेवी | ७६,५९,६०८ | कर्जें | ४२,८४,५६८ |
| नफा | ७९,४७६ | इमारत इ. | ३०८,२३२ |

## पाकिस्तानचा कागदाचा नवा कारखाना

पूर्व-पाकिस्तानांत चितगांवापासून १५ मैलांवर चंद्रगांव येथें कागदाचा एक कारखाना काढण्याचें पाकिस्तान सरकारनें ठरविलें होतें. चंद्रगांवांत आतां ह्या कारखान्याची धामधूम सुरू झाली आहे. कारखान्याची यंत्रसामुग्री नुकतीच येऊन पोंचली आहे. कारखान्यासाठीं एकूण खर्च सुमारें ४,५०,००,००० रुपये येणार आहे. यंत्रसामुग्री घेऊन येण्यास दोन बोटी लागल्या. कांहीं यंत्रसाहित्य युरोपांतून आणि कांहीं अमेरिकेंतून आणण्यांत आलें आहे. तिसऱ्या एका बोटीनें कारखान्यासाठीं लागणारा कच्चा मालहि आणला आहे. उत्पादनांत प्रत्यक्ष गुंतणाऱ्या यंत्रसाहित्याची किंमत सुमारें २,३०,३६,५२६ रुपये आहे आणि कारखान्याच्या उभारणीला लागणाऱ्या सामुग्रीची किंमत २६,३७,१५२ रुपये आहे. कारखान्याच्या जागेची पहाणी आणि साफसफाई पूर्ण झाली आहे. अधिकारी वर्ग आणि इतर नौकर ह्यांना रहाण्यासाठीं ५०० घरें बांधून तयार झालीं आहेत. आणखीहि इमारती बांधण्याचें काम चालू आहे. कारखान्याला लागणारी वीज आणि वाफ पुरविण्यासाठीं १३,५०० किलोवॅट वीज उत्पन्न करण्याचें एक केंद्र उभारण्यांत आलें आहे. पाण्याच्या पुरवठ्याची व्यवस्थाहि पूर्ण झाली आहे. कारखान्याच्या मुख्य इमारतीच्या बांधकामाला लवकरच प्रारंभ होणार आहे. कागद तयार करणाऱ्या यंत्रांचा एक संच १९५१ अखेर काम करूं लागेल. १९५३ च्या प्रारंभीं सर्व कारखाना कागद उत्पन्न करूं लागेल. पूर्ण उत्पादन होऊं लागलें म्हणजे दरवर्षी सुमारें ३०,००० टन कागद तयार होईल, आणि पाकिस्तानला लागणाऱ्या लिहावयाच्या आणि छापावयाच्या कागदाची गरज पूर्णपणें भागेल असा अंदाज करण्यांत आला आहे. पू. पाकिस्तानची आर्थिक भरभराट तर ह्या कारखान्यामुळें होईलच, पण शिवाय ३,५०० कामगारांना रोजगारहि मिळेल.


सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लि.



( स्थापना १९१८ )

बचतीच्या विविध योजना.

हेड ऑफिस– गिरगांव, मुंबई.

शाखा: दादर, माहीम, बेळगांव


## दि सुप्रीम बँक ऑफ इंडिया लि., बेळगांव

वरील बँकेस १९५० ह्या वर्षी २४,१५१ रु. नफा झाला. रिझर्व्ह फंड ५ हजार रु., कराची तरतूद ५,५०० रु., बॅड डेट रिझर्व्ह फंड १,७५० रु., अशी वाटणी करून उरलेल्या रकमेंतून ऑर्डिनरी भागांस ४½% करमाफ डिव्हिडंड व क्यु. प्रे. भागांस ६½% करमाफ डिव्हिडंड देण्यांत यावयाचें आहे. बँकास सर्व-साधारणपणें येणाऱ्या अडचणी लक्षांत घेता, सुप्रीम बँकेनें २१ लक्ष रु. खेळत्या भांडवलावर, बँकांकडून कर्जाऊ रकमा ताळेबंदांत न दाखवितां, चांगला नफा मिळविला आहे. बँकेच्या कोल्हापूर आणि अरोंदे ( रत्नागिरी ) येथें शाखा आहेत.

( चेअरमन : एस. जी. पंत बाळेकुंद्री, बी. ए., एलएल. बी. मॅ. डायरेक्टर: एस. के. सामंत )

### संक्षिप्त ताळेबंद

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | २,५०,०७० | रोख व इतर बँकांत | ८,१९,४३७ |
| रि. व इतर फंड | ५६,८४१ | इनव्हेस्टमेंट | ३,४२,८१२ |
| ठेवी | १७,०५,९३९ | कर्जें | ७,०५,००३ |
| नफा | २४,१५१ | | |

## मुरादाबाद येथील पितळयाच्या मालाचा कारखाना

संयुक्त-प्रांत सरकारच्या अर्थशास्त्र आणि आंकडेशास्त्र खात्या-तर्फे मुरादाबाद येथील पितळेच्या वस्तूंच्या धंद्यासंबंधीं एक तपशीलवार अहवाल प्रसिद्ध करण्यांत आला आहे. ह्या धंद्यासंबंधीं इतकी साधार माहिती प्रसिद्ध होण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे. श्री. विश्वनाथ प्रसाद चतुर्वेदी ह्यांनीं माहिती जमविण्याचें काम केलें. त्यासाठीं त्यांना तीन वर्षें लागलीं.

प्रस्तुतच्या धंद्यासंबंधींची आर्थिक आणि व्यापारविषयक चर्चा अहवालांत बरीच विस्तारानें करण्यांत आली आहे. धंदा आधुनिक पद्धतीवर संघटित करण्यासाठीं काय करावें ह्या संबंधीं सूचनाहि करण्यांत आलेल्या आहेत. आतांपर्यंत हा धंदा घरगुती स्वरूपाचा होता. एखादा-दुसरा कसबी कामगार आणि त्याचें कुटुंब स्वतः खपून उत्पादन करीत असे. अलीकडे मात्र कांहीं ठिकाणीं यंत्रें वापरण्यांत येऊं लागलीं होतीं, व आहेत. धंद्याला असलेल्या आंतरराष्ट्रीय महत्त्वाचा विचारहि अहवालांत करण्यांत आलेला आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेंत मुरादाबादच्या पितळेच्या मालाला जें कांहीं थोडेंबहुत महत्त्व प्राप्त झालेलें आहे, त्याचें श्रेय खाजगी रीतीनें माल निर्यात करणाऱ्यांनाच आहे. ह्या बाबतींत सरकारची मदत जवळजवळ नाहींच असें म्हटलें तरी चालेल. ह्या उद्योग-धंद्यांत सुमारें २५,००० कामगार गुंतलेले आहेत. परंतु त्यांची सध्याची अवस्था शोचनीय आहे. शहराच्या निरनिराळ्या भागांत वस्ती करून हे कामगार राहिलेले आहेत. त्यांचीं घरें हीं घरें ह्या नांवाला मुळींच योग्य नाहींत. आरोग्याच्या दृष्टीनें योग्य अशीं घरें त्यांना मिळवून देण्याची फार जरूर आहे. मेल्या ऑगस्ट-मध्यें संयुक्त-प्रांत सरकारचे गव्हर्नर श्री. मोदी ह्यांना मुरादाबाद नगरपालिकेनें मानपत्र दिलें होतें. त्यावेळीं नगरपालिकेनें कामगारांच्या घरांबाबत कांहींतरी करावें अशी सूचनाहि त्यांनीं केली होती.

## प्रा. ध. रा. गाडगीळ ह्यांचें अभिष्ट चिंतन

सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ प्रा. धनंजयराव गाडगीळ ह्यांच्या वयास १० एप्रिल, १९५१ रोजीं ५० वर्षें पूर्ण होऊन त्यांनीं ५१ व्या वर्षांत पदार्पण केलें. ह्यासमयीं त्यांचें अभिष्ट चिंतन करून त्यांना आयुरारोग्य चिंतणें योग्यच होईल. प्रा. गाडगीळ हे मूळचे नागपूरकडचे. त्यांचें प्राथमिक शिक्षण व माध्यमिक शिक्षण नागपूरकडेच झालें व उच्च शिक्षणासाठीं त्यांनीं सन १९१८ चे सुमारास परदेशीं प्रयाण केलें. तेथें त्यांनीं विश्वविद्यालयाचे परिक्षेत उत्तम यश मिळविलें व त्या काळीं सनदी नोकरीच्या परीक्षेस बसण्याचा मोह आवरून संशोधन कार्यास वाहून घेण्याचें ठरवून त्यांनीं त्याप्रमाणें अभ्यास सुरू करून त्याही परिक्षेंत यश मिळविलें. मायदेशीं परत आल्यावर फार थोडीं वर्षें त्यांनीं सरकारी, व कॉलेजचीं प्राचार्य म्हणून नोकरी केली व पुढें पुणें येथें कायमचें वस्तिस्थान निश्चित करून त्यांना गोखले राजकारण व अर्थशास्त्र संशोधन संस्था स्थापून ह्या संस्थेचेद्वारें त्यांनीं गेलीं २० वर्षें देशाची अत्युच्च दर्जाची सेवा केली आहे.

सार्वजनिक आयुष्यास लागणारे सर्व गुण त्यांचे अंगीं वसत आहेत. महाराष्ट्राच्या थोर परंपरेस ललामभूत होणारे प्रा. गाडगीळ हे आतां जागतिक कीर्तीचे ख्यातनाम पुढारी झाले आहेत. प्रा. गाडगीळ यांचे अर्थशास्त्र, शेतीव्यवहार, सहकारी चळवळ, धान्यवांटप वगैरे प्रश्नांबाबत विचार मौलिक असून ते या कार्यक्षेत्रांत अधिकारवाणीनें आपले विचार व्यक्त करीत असतात. त्यांचा हा एक्कावन्नावा वाढदिवस ते मायभूमीपासून दूर असा साजरा करतील परंतु त्यांचें मन व अंतःकरण मायभूमीकडेच ओढलेलें असणार. प्रा. ध. रा. गाडगीळ योनीं अगदीं अल्प वयांत जें मानाचें स्थान मिळविलें व त्यामुळें नुसत्या महाराष्ट्राचे नाहीं तर अखिल भारताचें नांव जागतिक क्षितिजावर अभिमानानें झळकत आहे त्याबद्दल मी त्यांच्या शिष्यांच्या व चहात्यांच्या वतीनें त्यांना कृतज्ञतापूर्वक अभिवादन करून त्यांची अशीच उत्तरोत्तर भरभराट व्हावी अशी परमेश्वरास प्रार्थना करतों.

अ. द. खोले.

---

### बँकांसंबंधी लवाद–मंडळाचा निवाडा बेकायदा

बँकांतील सुमारें ६० हजार नोकरांशीं संबंध असलेला ३१ जुलै १९५० चा औद्योगिक लवाद–मंडळाचा बँकांसंबंधीचा निवाडा सुप्रीम कोर्टानें ४ विरुद्ध २ मतांनीं, बेकायदा ठरविला. लवाद–मंडळाच्या आधिकार–कक्षेंतच सदर निवाडा बसत नाहीं.

---

### वाई अर्बन बँकेची नवी इमारत

दि वाई अर्बन कोऑपरेटिव्ह बँक लि. वाई, या संस्थेनें बांधलेल्या नूतन इमारतीचा औपचारिक उद्घाटन समारंभ शनिवार ता. ७।४।१९५१ रोजीं सायंकाळीं ६ वाजतां श्री. भाऊसाहेब सोमण, अध्यक्ष वरिष्ठ कायदे कौन्सिल, मुंबई, यांचे अध्यक्षतेखालीं झाला.

---

### पूना मर्चंटस बँकेचें सरस्वती–लक्ष्मी पूजन

पूना मर्चंटस को. बँक लि.नें प्रतिवर्षाप्रमाणें दि. ७ रोजीं श्रीसरस्वती व श्रीलक्ष्मी पूजन केलें आणि त्यानिमित्त पानसुपारी समारंभ केला.

सर्व प्रकारचें बँकिंगचें काम केलें जातें

धी युनायटेड कमर्शिअल बँक लि.

विक्री झालेले भांडवल
रु. ४ कोटी
भरणाई झालेले भांडवल
रु. २ कोटी
राखीव निधी
रु. ६० लक्ष

मुख्य कचेरी
कलकत्ता

जी. डी. बिर्ला — चेअरमन
बी. टी. ठाकूर — जनरल मॅनेजर

स्थापना १९३६
युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा
पॅलेस स्ट्रीट, सातारा.
शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नाशिक व बार्शी.
ता. ३१–१२–५० अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | २०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ५,६०,४६५ |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. | १,५१,००० |
| ठेवी | रु. | ७५,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ८६,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :
१ वर्ष रु. २–८–० ; दोन वर्षे रु. २–११–० ; तीन अगर अधिक वर्षे ३ रुपये

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १–८–० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | २–०–० |
| चालू डिपॉझिट | " | ०–८–० |

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
सी. ह. जोशी., बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.
वा. ग. चिरमुले, बी. ए., एलएल्. बी., चेअरमन

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

# विमा कायद्यांतील नवी दुरुस्ती

## व्यवस्थापकांचे अनिर्बंध अधिकार संपले

### वेतनाचे करार निरंकुश नाहींत

( लेखक:—श्री. स. वा. दातार, बी. एस्सी., एलएल. बी., पुणें )

गेल्या वर्षी पास झालेल्या ' इन्शुरन्स अमेंडमेंट ॲक्टा'ची अंमलबजावणी १ जून, १९५० पासून सुरू झाली आहे. ह्या कायद्यानें करण्यांत आलेल्या दुरुस्त्यांमुळें विमा–कायद्यांत अगदीं मूलग्राही असे महत्त्वाचे फरक घडून आले आहेत.

विम्याचा प्रसार हिंदुस्थानांत गेल्या सुमारें ३०–३५ वर्षांतच झाला. प्रारंभीच्या प्रवर्तकांनीं विमा–धंद्यावर जे नफे मिळविले व त्यांच्या जोरावर अन्य आर्थिक क्षेत्रांत सुद्धां ज्या पुंडाया माजविल्या त्यांच्यामुळेंच सरकारला विमा- व्यवहारांवर निर्बंध घालण्याचे प्रसंग निर्माण झाले.

विमा–व्यवसायाचें राष्ट्रीयीकरण करावें अशी सुद्धां जनतेची मागणी आहे. कित्येक व्यावसायिकांचें असें म्हणणें आहे कीं, प्रस्तुतच्या दुरुस्तीच्या कायद्यानें ती मागणी मोठ्या प्रमाणांत पुरी करण्यांत आली आहे. पूर्ण राष्ट्रीयीकरण जरी साधलें गेलें नसलें तरी राष्ट्रीयीकरणाच्या दिशेनें बरीच प्रगति ह्या दुरुस्तीच्या कायद्यानें केली आहे, एवढें निश्चित.

### व्यवस्थापकवर्गाची सुलतानशाही

ह्या ठिकाणीं व्यवस्थापकवर्ग या संज्ञेंत मॅनेजिंग एजंट, मॅनेजिंग डायरेक्टर, चीफ एजंट, प्रिन्सिपल एजंट अथवा स्पेशल एजंट अशा अधिकारावर असलेल्या व्यक्ती किंवा पेढ्या अथवा कंपन्या– अंतर्भूत मानल्या आहेत. विमा-व्यवसायांतील व्यवस्थापकवर्गाला पूर्वी अगदी सुलतानी अधिकार होते व त्या अधिकारांच्या बळावर त्यांनीं अनेक आर्थिक पुंडाया माजविल्या ही गोष्ट सुबुद्ध महाराष्ट्रीय जनतेस अज्ञात नाहीं.

प्रारंभीं विमा उतरविणारे गिऱ्हाईक मिळविल्याबद्दल विमा-दलालाला किती कमिशन द्यावें ह्याला कांहीं मर्यादाच नव्हती. विमा कंपनीला परवडेल असें कमिशन खुशाल देतां येत होतें. विमेदारांनीं हप्त्यांचा भरलेला जो विमानिधी विमासंस्थेच्या तिजोरींत जमा होई त्याची गुंतवणूक कशी करावी ? त्या गुंतवणुकीस सुरक्षितता कितपत आहे ? आणि प्रसंगीं अपमृत्यूमुळें विमेदारास रक्कम देण्याची वेळ आली तर त्यासाठीं काय तरतूद ठेवली आहे ? ह्या मुद्यांसंबंधीं कोणताहि विवेक न धरतां व्यवस्थापक वर्ग अनिर्बंधपणें विमानिधीची गुंतवणूक मन मानेल त्या प्रकारांनीं करूं शकत होता. शिवाय, ह्या व्यवहारांतहि वशिलेबाजी, लांचलुचपत व दुहेरी कमिशन काढण्याचे प्रकार ह्यांचा बुजबुजाट झालेला होता. त्यामुळें ह्या व्यवस्थापक वर्गाविरुद्ध जनतेंत मोठीच ओरड झाली आणि सरकारला वेळोवेळीं कायदे करून व्यवस्थापक वर्गाच्या सुलतानी सत्तेवर नियंत्रणें घालावीं लागलीं.

### मालकी हक्क संपला

सांप्रतच्या दुरुस्तीच्या नव्या कायद्यानें कोणतीहि विमा संस्था अथवा विमा कंपनी इतःपर कोणाहि एका व्यक्तीकडे, भागीदारी पेढीकडे अथवा लिमिटेड कंपनीकडे आपली व्यवस्था सुपूर्त करूं शकणार नाहीं. ह्याचाच अर्थ असा कीं, व्यवस्थापक वर्गाचा विमा संस्थेवरील मालकीहक्क नाहींसा करून ह्या कायद्यानें त्यांना कंपनीचे नोकर बनविलें आहे.

विमा संस्थांचे अनेक व्यवस्थापक ह्या पूर्वी संस्थेचें काम अन्य नोकरांकरवीं परस्पर करवून घेऊन आपला तनखा मात्र संस्थेशीं झालेल्या कराराच्या जोरावर जवळ जवळ फुकटफाकट वसूल करीत होते. इतकेंच नव्हे तर अशा प्रकारें लाभलेल्या आर्थिक स्वास्थ्याच्या अथवा सामर्थ्याच्या जोरावर पुष्कळ वेळां ज्या व्यवसायांची वास्तविक त्यांना माहिती नाहीं अशा व्यवसायांत नव्या कंपन्या वगैरे काढून जनतेची व स्वतःची वंचना आणि त्या व्यवसायांतील जाणत्या लोकांच्या कामाचा विचका हे लोक करीत होते. ह्यासाठीं नव्या दुरुस्तींत अशी अट घालण्यांत आली आहे कीं विमा कंपनीचे व्यवस्थापक हे विमा कंपनीचे नोकर असले पाहिजेत; एवढेंच नव्हे तर विशिष्ट परिस्थितींत त्यांनीं सर्व दिवसभराचे ( होल टाइम ) नोकर म्हणूनच काम केलें पाहिजे.

दुसरी गोष्ट अशी कीं आयुष्याचा विमा उतरविणाऱ्या एकापेक्षां अधिक विमासंस्थांमध्यें व्यवस्थापकांची जागा इतःपर कोणाहि व्यक्तीस स्वीकारतां येणार नाहीं. त्याचप्रमाणें कोणत्याहि व्यवस्थापकास वेतन अथवा वेतनाचा भाग म्हणून संस्थेस मिळालेल्या विमा धंद्यावर विशिष्ट प्रमाणांत कमिशन स्वीकारतां येणार नाहीं. परंतु ह्या अटीमुळें व्यवस्थापकानें स्वतःस एजंट म्हणून कंपनीस विमाधंदा मिळवून दिलेला असेल त्यावरील सामान्य एजंट ह्या नात्याचे नेहमींप्रमाणेंच कमिशन त्यास मिळण्यास मात्र कांहीं आडकाठी येणार नाहीं.

### व्यवस्थापकवर्गाची चलाखी

दुरुस्तीच्या नव्या कायद्यानें वरीलप्रमाणें नियंत्रणें घातलीं गेल्यावर व्यवस्थापक वर्गांत मोठीच घांदल उडाली; व पूर्वीचे मॅनेजिंग एजन्सीचे, मॅनेजिंग डायरेक्टरशिपचे, आणि ज्या मॅनेजरांना उक्ती रक्कम व कमिशन ह्यांच्या रूपानें वेतन मिळत होतें त्यांचे मॅनेजरशिपचे करार दुरुस्त करून घेणें भाग झालें. हे करार प्रामाणिकपणें व सरळबुद्धीनें करणारे लोक कोणीच नसतील असें म्हणणें नाहीं. परंतु, जित्याची खोड मेल्याशिवाय जात नाहीं म्हणतात त्याप्रमाणें कित्येक सद्गृहस्थांनीं हे नवे करार करतांना, जणूं काय कायदा करणाऱ्यांचा सूड उगवावा अशा आविर्भावानें एवढी चलाखी करून दाखविली आहे कीं सामान्य मनुष्य आश्चर्यानें थक्कच होईल.

### करार निरंकुश नाहींत !

विमाकंपन्यांशीं वरीलप्रमाणें केलेले करार हे निरंकुश राहातील अशा स्वप्नांत वरील प्रकारचा चटावलेला व्यवस्थापकवर्ग रंगलेला दिसतो. परंतु प्रस्तुतच्या दुरुस्तीचा कायदा करणारांना अशा स्वरूपाच्या करारांची कल्पना थोडीफार होती असें दिसतें. कारण, प्रमाणाबाहेर वेतन देण्यावर नियंत्रण घालण्याचे अधिकार ह्या कायद्यानें केंद्र-सरकारकडे मुद्दाम देऊन ठेवले आहेत. दुरुस्तीच्या कायद्याचें कलम ३१ बी ह्यामध्यें पहिल्या भागांत अप्रमाण वेतन देण्यावर निर्बंध घालण्याचे अधिकार नमूद करण्यांत आले असून त्यासंबंधींचे करारांत बदल करावयास लावण्याचेहि अधिकार केंद्र सरकारला देण्यांत आले आहेत. विशेष असा कीं, करारांत अशा प्रकारें बदल झाल्याबद्दल व्यवस्थापकाला कोणतीहि भरपाई देण्याची जरूर नाहीं. बदल केल्याप्रमाणें ज्या स्वरूपाचा करार शिल्लक राहील तो व्यवस्थापकाला पसंत पडला नाहीं तर खुशाल त्यानें काम सोडून चालतें व्हावें, अशा तऱ्हेची तरतूद पहिल्या भागांत आहे.

कलम ३१ बी च्या दुसऱ्या भागांत विमा कंपनीनें प्रतिवर्षी पगार म्हणून अथवा कमिशन म्हणून ५,००० रु. पेक्षां अधिक रक्कम

जर कोणाला दिली असेल तर त्याची माहिती पुरविणें सक्तीचें करण्यांत आलें आहे, आणि ३१ बी ह्या शेवटच्या भागांत चीफ एजंट, अथवा स्पेशल एजंट ह्यांच्या व्यतिरिक्त जे इतर कोणी नोकर वार्षिक ५,००० रु. पेक्षां अधिक वेतन विमा कंपनी-कडून घेत असतील त्यांचे करार विमाकंपनीस नोटीस देऊन परीक्षणासाठीं मागवून घेण्याचा अधिकार 'कंट्रोलर' ह्यांस देण्यांत आला आहे.

अशा प्रकारें कोणी नोकर असो वा विमाएजंट असो त्याला मिळणाऱ्या वेतनावर नियंत्रण ठेवण्याची तरतूद नवीन कायद्यानें झाली आहे. सारांश, उदासीन भागदारांच्या प्रॉक्झीपद्धतीनें मिळविलेल्या बहुमतावर किंवा डायरेक्टरांना मिंधें करून अप्रमाण वेतनाचे करार निरंकुश राखता येतील अशी जर कांहीं लोभी व लबाड व्यवस्थापकांची कल्पना असेल, तर तो इतःपर भ्रमच ठरणार आहे. अर्थात, सरकार व हितसंबंधी लोक ह्यांच्या जागरूकपणावरच पुष्कळसें अवलंबून रहाणें क्रमप्राप्तच आहे.

## बोरिंगच्या कामाचे नवे दर

शेतकी खात्यातर्फें बोरिंगच्या यंत्रांनीं करण्यांत येणाऱ्या बोरिंगच्या कामाचे दर मुंबई सरकारनें दुरुस्त केले आहेत. नवे दर येत्या १ एप्रिल पासून अंमलांत आले. हे नवे दर पुढीलप्रमाणें आहेत:—

| खोली फूट | चार इंची बोरला दर फुटास | सहा इंची बोरला दर फुटास | आठ इंची बोरला दर फुटास |
|---|---|---|---|
| ० ते १०० | रु १८ | रु. २२ | रु. २८ |
| १०१ त २०० | रु. २० | रु. २४ | रु. ३० |
| २०१ ते ३०० | रु. २२ | रु. २६ | रु. ३२ |
| ३०१ ते ४०० | रु. २५ | रु. २९ | रु. ३५ |
| ४०१ ते ५०० | रु. २८ | रु. ३२ | रु. ३८ |
| ५०१ ते ६०० | रु. ३२ | रु. ३६ | रु ४२ |
| ६०१ ते ७०० | रु. ३६ | रु. ४० | रु. ४६ |
| ७०१ ते ८०० | रु. ४० | रु. ४४ | रु. ५० |

बोरिंगचीं कामें करण्यासाठी सरकारनें जिल्हा लोकल बोर्डांना जीं यंत्रें दिलीं आहेत त्यांच्या बाबतींतहि जिल्हा लोकलबोर्डें हेच दर आकारतील.

नव्या दरांत सर्व प्रकारच्या खर्चाचा समावेश केला आहे. तेव्हां शेतकऱ्यांनीं कोणत्याहि प्रकारचा जादा आकार देण्याची आवश्यकता नाहीं.

## दि कोल्हापूर गव्हर्मेंट सर्व्हंटस् को. बँक लि.

वरील बँकेचें भांडवल ३०-६-५० अखेर ७१,५४० रु. झालें आहे. रिझर्व्ह व इतर फंड ५९,०२५ रु. असून ठेवींची रकम २,१५,६२७ रु. आहे. साल अखेरीस सभासदांकडून येणें कर्ज ३,२७,७०२ रु. आहे. अहवालाचे वर्षीं १,४३,८०७ रु. चीं नवी कर्जें देण्यांत आलीं व येणें कर्जांपैकीं १,६५,१७२ रु. चा वसूल झाला. थकबाकी वसुलीसाठी बँकेची कचेरी योग्य ती दक्षता घेत आहेच. निव्वळ नफा ७,२६७ रु झाला. प्रेसिडेंट व मॅनेजिंग डायरेक्टर ह्यांच्या कामगिरीचा गौरवपूर्ण उल्लेख डायरेक्टरांच्या अहवालांत आला आहे. (प्रेसिडेंट: पांडुरंग हरिबा हळदकर. मॅ. डायरेक्टर: गोविंदराव कृष्णराव माळी.)


दि रत्नाकर बँक, लि.

(कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली)

स्थापना : १९४३

मुख्य कचेरी: भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर

शाखा—सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर.

| | रु. |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... | २०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल ... | १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल ... | ५,०३,००० |
| रिझर्व्ह फंड ... | ५१,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) ... | ४७,६६,००० |

—अद्यावत् बँकिंग व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. पाटील, B. A., LL. B., वकील, सांगली, चेअरमन

श्री. गंगाराम सिद्धाप्पा चौगुले, कोल्हापूर, व्हा. चेअरमन

एल. एन्. शहा, B. COM., C. A. I. I. B, मॅनेजर








हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाविवास', ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.